# "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीयोजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७

साध्या पेपरवर विद्यार्थी वडील / आई/ पालकांच्या सहमतीने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र

१. मी /आम्ही खाली सही करणार असे प्रमाणित करतो/ करते की, मी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील आहे. कुटूंबातील दोन्ही पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्नाचे निकष पुर्ण करतो/करते तसेच मी /आम्ही दिनांक ३१ मार्च २०१६ व दि. १३ ऑक्टोंबर, २०१६ रोजीचा शुल्क प्रतिपुर्तीबाबतचा शासन निर्णय वाचला असून त्यातील सर्व अटी मान्य आहेत.

२. मी / आम्ही महाराष्ट्र राज्याचा अधिवासधारक आहे / वादग्रस्त महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती क्षेत्रातील अधिवासधारक आहे.

३. माझा प्रवेश हा शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (CAP) झालेला आहे.

४. मी / आम्ही फक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मिळणाऱ्या योजनेच्या सवलतीचा लाभ घेतलेला आहे / अन्य कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला नाही व करणार नाही, अशी हमी देत आहे.

५. मी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या संस्थेत शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे व प्रत्येक सत्राची परिक्षा देणे मला बंधनकारक आहे. याची मला जाणीव आहे. मी एखादया सत्राची (सेमिस्टरची) परिक्षा दिलेली नसल्यास अथवा एखादया वर्षात अनुतीर्ण झाल्याने पुढील वर्षी प्रवेश न मिळाल्याने सदर योजना लागू राहणार नाही. मी अभ्यासक्रम पूर्ण करतांना एकुण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुतीर्ण झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी मला प्रवेश मिळाला नसेल तर उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी मला लाभ मिळण्यास मी अपात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

६. मी / आम्ही संस्थेला दिलेली अर्जात नमुद केलेली माहीती चुकीची अथवा दिशाभुल करणारी नाही. संस्थेला सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे असे निदर्शनास आल्यास उर्वरित कालावधीसाठी मला लाभ मिळणार नाही. तसेच मला मिळालेली प्रतिपुर्ती शुल्काची रक्कम व्याजासह माझ्याकडून वसूल करण्यात येईल. त्यापुढे मला शिष्यवृत्ती /शुल्क प्रतिपुर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल याची मला जाणीव आहे. व होणाऱ्या परिणामास किंवा शिक्षेस सर्वस्वी मी / आम्ही स्वत: जबाबदार राहील

७. माझ्या स्वत:च्या चुकीने / वर्तनामूळे शैक्षणिक प्रगती करीत नसेल, पूर्व परवानगी शिवाय मी अनियमित गैरहजर राहत असेल असे संस्थाप्रमुखाच्या निदर्शनास आले. तर माझी शुल्क प्रतिपुर्ती रक्कम त्वरीत थांबविण्यात येईल किंवा समाधान न झाल्यास रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

८. मी मध्येच अभ्यासक्रम सोडून गेलो तर मला प्रदान केलेल्या प्रतिपुर्तीची रक्कम शासनास योग्य वाटल्यास माझ्याकडून वसूल करू शकेल याची मला कल्पना आहे.

९. प्रतिपुर्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पुर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व बदल केल्यामुळे आमचे नुकसान झाल्यास मी / आम्ही किंवा संस्थां शासना विरूध्द दावा / तक्रार करणार नाही.

| | |
|---|---|
| विद्यार्थ्यांची सही | विद्यार्थ्यांच्या पालकांची सही |
| (नाव:- ) | (नाव:- ) |

संस्था प्रमुखाची सही व शिक्का